बीड । शनिवार
२९.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३५०
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक • www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 




# भाषण करतानाच... मनोज जरांगे पाटील कोसळले स्टेजवरच प्रकृती खालावली




**बीड । प्रतिनिधी**

कार्यक्रमादरम्यान मनोज जरांगे पाटील यांची तब्येत खालावली आहे. भाषण करत असताना त्यांना स्टेजवरतीच चक्कर आली. त्यामुळे ते जागेवरच खाली बसले. बीडमध्ये सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी भाषण करताना अचानक मनोज जरांगे यांची प्रकृती खालावली.

भाषण सुरू असतानाच मनोज जरांगे यांना अस्वस्थ वाटायला लागलं. त्यामुळे त्यांनी काही वेळ भाषण थांबवलं. भाषण संपल्यानंतर तातडीने मनोज जरांगे यांना रुग्णवाहिकेनं हॉस्पिटलला नेण्यात आलंय. बीडमधील शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, केमिस्ट, वकील, इंजिनिअर आणि कर्मचारी संघटनाचा आज बीडमध्ये मेळावा होता. यावेळी व्यासपीठावर मनोज जरांगे यांच्यासह धनंजय देशमुख देखील उपस्थित होते. परंतु भाषण सुरू केल्यानंतर अचानक जरांगे पाटलांना अस्वस्थ वाटायला लागलं. त्यामुळे मनोज जरांगे यांनी मध्येच भाषण थांबवलं. मला शब्दही फुटत नाही, असं म्हणत जरांगेंनी मध्येच भाषण थांबवलं होतं. त्यानंतर त्यांनी थोडावेळ थांबून पुन्हा भाषणाला

▶▶ उर्वरित पान २ वर

# आष्टीत आ.सुरेश धस यांच्यावतीने दावत-ए-इफ्तार पार्टी संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी ईदगाह मैदान येथे भाजपा आ.सुरेश धस यांच्यावतीने मुस्लिम बांधवांसाठी दावत-ए-इफ्तारचे आयोजन दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी रमजानच्या पवित्र महिन्यात शेवटच्या शुक्रवारी दि.२८ मार्च रोजी आष्टी येथील ईदगाह रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

मुस्लिम समाजाचा पवित्र महिन्याचे औचित्य साधून भाजपाचे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आ.सुरेश धस हे दरवर्षी मतदारसंघात मुस्लिम बांधवांसाठी



इफ्तार पार्टीचे आयोजन करतात.

सर्वधर्मिय जातीय सलोखा जोपासला जावा, समाजा-समाजामध्ये एकता आणि सामाजिक सलोख्याचा विश्वास अधिक दृढ व्हावा या उद्देशाने रोजा इफ्तार पार्टीचे आ. सुरेश धस यांच्यावतीने आयोजन केले जाते.याचेच औचित्य साधून रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील अनेक नागरिकांनी यावेळी आस्वाद घेतला.यावेळी आ.सुरेश धस यांनी उपस्थित मुस्लिम बांधवांना रमजान महिन्याच्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी युवा नेते जयदत्त धस, नगराध्यक्ष जिया बेग, डॉ. अजहर बेग, सय्यद तय्यब,

▶▶ उर्वरित पान २ वर

# अजित पवारांनी आदेश देताच विभागीय आयुक्त लागले कामाला

## बीडच्या बिंदूनामावली प्रकरणात महत्त्वाचे निर्देश

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील महसूल, पोलिस, जिल्हा परिषद, शिक्षण विभागात नोकर भरती, जिल्हा बदली, पदोन्नती करताना बिंदूनामावली पाळली गेली का, याचा आढावा घेण्याचे निर्देश विभागीय आयुक्त व या समितीचे अध्यक्ष दिलीप गावडे यांनी शुक्रवारी (ता. २८) दिले. श्री. गावडे सर्व प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेतली.




मागच्या अनेक वर्षांपासून जिल्हा परिषद, पोलिस, महसूल व शिक्षण या विभागांत बिंदूनामावलीचे पालन करण्यात आलेले नाही. त्याचा फटका खुल्या, ओबीसी, एससी, एसटी प्रवर्गांतील उमेदवारांवर झाल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने बुधवारी (ता. २६) मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

या प्रकाराच्या चौकशीसाठी विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या अध्यक्षतेखालील समिती नेमण्यात आली आहे. याची पहिली बैठक शुक्रवार, दि. २८ मार्च रोजी झाली. जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मुख्य कार्यकारी

▶▶ उर्वरित पान २ वर

# अवघ्या 5 तासांत दोषारोपपत्र न्यायालयात दाखल; परळी पोलिसांची वायुवेगाने कारवाई

**परळी वै. । प्रतिनिधी**

गुन्हा घडल्यानंतर तो नोंदवण्यापासून ते न्यायालयात दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत पोलीस प्रक्रियेस बराच कालावधी लागतो, हा सर्वसामान्य अनुभव आहे. मात्र, परळी शहर पोलिसांनी या पारंपरिक प्रक्रियेच्या कल्पनांना छेद देत अवघ्या पाच तासांत संपूर्ण तपास पूर्ण करून गुन्ह्याचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करून एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

शुक्रवारी (दि. २८) सकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास परळी शहर पोलीस ठाणे हद्दीतील कडबा मार्केट वखार महामंडळाच्या मोकळ्या जागेतील झाडाझुडपांमध्ये महिलांसाठी अत्यंत लज्जास्पद प्रकार घडला. काही महिला प्रातः विधीसाठी त्या ठिकाणी गेल्या असता आरोपी दबा धरून बसला होता. त्याने महिलांसमोर अश्लील वर्तन करत त्यांना लज्जास्पद इशारे केले. घटनेची माहिती मिळताच परळी शहर पोलिसांनी तात्काळ दखल घेत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. आरोपी भुजंग वाघमारे (वय २८, रा. रामनगर) याला त्वरित अटक करण्यात आली. विशेष म्हणजे, पारंपरिक पोलीस कार्यपद्धतीला बाजूला

▶▶ उर्वरित पान २ वर

# भगवंताच्या स्मरणात सुख शांती व आनंदाचा मार्ग मोकळा होतो: ह.भ.प. श्रीहरी महाराज रसाळ

**गेवराई । प्रतिनिधी**

शिव आणि शक्ती अनादी कालापासून ह्या ब्रम्हांडाच्या उत्पत्ती स्थिती आणि लय या तिघांचे साक्षीदार आहेत. कथेमध्ये शिव पार्वती विवाह समारंभ प्रसंगी सज रहे भोले बाबा निराले दूल्हे थे या भजनांवरती सर्वांनी नृत्य करून आनंद घेतला. शंभु -पार्वती विवाह समारंभात हिमालय पर्वत मेणा राणी, लक्ष्मीनारायण, ब्रह्मदेव, नारद महामुनी, तसेच भूतांची



आणि नंदी व शंभू महादेव -पार्वती यांची सजीव आरस करण्यात आली. मंत्रघोषात मंगलाष्टका सादर करण्यात आले. सावता नगर येथे सुरू असणाऱ्या श्री शिव

▶▶ उर्वरित पान २ वर

# बालविवाहप्रकरणी तिघांवर बलात्कार, पोक्सो, बालविवाह, अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा

**केज । प्रतिनिधी**

एका १५ वर्ष ९ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीचा तिच्या आई व आईच्या संपर्कातील एका व्यक्तीने प्रजातीच्या तरुणाशी

बळजबरीने विवाह लावून दिला, तर विवाह लावून दिलेल्या तरुणाने तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवल्याची तक्रार या अल्पवयीन मुलीने दिली. यावरून तिघांविरुद्ध केज पोलिसात बलात्कार, पोक्सो, बालविवाह आणि अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी या तिघांना ताब्यात घेतले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथील एका १५ वर्ष ९ महिन्याच्या अल्पवयीन मुलीचे लग्न तिची आई आणि आई सोबत लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत असलेल्या विलास पांढरे नावाच्या व्यक्तीने साळेगाव (ता. केज) येथील बालाजी शाहू लांडगे या परजातीच्या तरुणासोबत बळजबरीने विवाह लावून दिला. तर बालाजी लांडगे याने ती अल्पवयीन असताना तिच्यासोबत

▶▶ उर्वरित पान २ वर

# 'भुजल पातळी खालावली, पाणी प्रश्न गंभीर होण्याआगोदर उपाय योजना करा'

**• उल्हास गिराम यांचे तहसीलदारांना निवेदन**

**बीड । प्रतिनिधी**

या वर्षी पाऊसकाळ अल्प प्रमाणात झाल्यामुळे भुजल पातळी मार्च मार्च महिन्यातच खालावली असुन, ग्रामीण भागात



पिण्याच्या पाण्याबरोबर पशुधन वाचवण्यासाठी वेळीच उपाय योजना करावी, या संदर्भात बीड चे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली.

ग्रामीण भागात पाणी प्रश्न डोके वर काढु लागला आहे. ज्या तलावात आज ही उपलब्ध पाणी साठा बरा आहे, अशी तलावे पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित करावीत, आवश्यक तिथे नियमित पाणीपुरवठा करावा, आवश्यक तिथे पाणी टँकर पुरवावेत, फार्मर आयडी साठी मुदतवाड मिळावी या मागणीचे निवेदन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे नूतन जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी बीड च्या तहसील कार्यालयास भेट दिली, तहसीलदार उपलब्ध नसल्याने नायब तहसीलदार सुहास हजारें साहेब यांना निवेदन देऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांच्या

▶▶ उर्वरित पान २ वर



# सीलबंद पाणी विकणाऱ्या सर्वच कंपन्या शासनमान्य असतात का ?

लहानपणी शाळेत मराठी व्याकरण शिकवले जात असे ज्यामध्ये सामान्य नाम आणि विशेष नाम असे नामाचे दोन प्रकार सांगितले जात. एकाच जातीच्या पदार्थातील समान गुणधर्मामुळे त्या वस्तूला मिळालेले नाव म्हणजे सामान्य नाम तर एकाच जातीच्या विशिष्ट व्यक्तीचा, प्राण्याचा किंवा वस्तूचा बोध करते त्या नावाला विशेष नाम असे म्हणतात. ही झाली व्याकरणातील व्याख्या. दैनंदिन जीवनात व्यवहारात उपयोगी पडणारी काही अशी विशेष नाम आहेत जी त्यांच्यातील गुणवत्तेमुळे आणि ग्राहकांच्या पसंतीमुळे सामान्य नाम बनून आज लोकांच्या ओठी रुजली आहेत. उदाहरणच द्यायचे तर ग्रामिण भागात (काही शहरी भागांतसुद्धा) अंगाचा साबण हवा असेल तर 'लाईफबॉय द्या' अशी मागणी ग्राहकांकडून केली जाते, अर्थात दुकानदाराला हे ज्ञात असल्याने तो ग्राहकांना त्याच्याकडे असलेला कोणताही अंगाचा साबण ग्राहकाला देतो आणि ग्राहकही तो आनंदाने स्वीकारतो. अशाच प्रकारे टूथपेस्ट म्हणून 'कोलगेट' मागितली जाते, भांड्यांचा साबण म्हणून 'विम बार' मागितला जातो. याच विशेष नामांतून सामान्य नाम झालेल्या उत्पादनांच्या यादीत आणखी एक नाव येते ते 'बिस्लेरी'चे. बिस्लेरी कंपनीने १९८४ मध्ये सर्वप्रथम सीलबंद फिल्टर्ड पाण्याची प्लास्टिक बाटली विक्रीसाठी आणली तेव्हा कोणाला वाटलेही नव्हते कि पाणी बाटल्यांत भरून विकण्याची संकल्पना भविष्यात जनसामान्यांत इतकी रुजेल की त्याहून जगणे मुश्किल होऊन जाईल. आज सीलबंद बाटल्यांची लोकांना इतकी सवय जडली आहे की बाहेर उपहारगृहात जेवताना किंवा काही अन्नपदार्थ खाताना उघड्यावरील विनामूल्य पाणी पिऊन पोटाला त्रास करून घेण्याऐवजी लोक २० रुपयांची एक लिटरची सीलबंद पाण्याची बाटली विकत घेणे पसंत करतात. पूर्वी प्रवासाला जाताना लोक घरातून पाण्याचे कॅन अथवा बाटल्या भरून घेऊन जात. आता असा त्रास कोणी करताना दिसत नाही. हल्ली स्थानकांवरच नव्हे तर तर चालत्या ट्रेनमध्ये आणि बसमध्येही थंडगार फिल्टर पाण्याची बाटली सहज उपलब्ध होऊ लागली आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरु आहेत. गेल्या काही दिवसांत उन्हाचा तडाखा प्रचंड वाढला आहे. शरीरातून घामावाटे जाणाऱ्या पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी लोक सीलबंद पाणी मोठ्या प्रमाणात विकत घेऊ लागले आहेत. आजमितीला केवळ शीतपेयाच्या दुकानांत किंवा उपहारगृहांतच नव्हे तर महामार्गाच्या ठिकाणी पानाच्या टपरीवर, फळांच्या आणि भाज्यांच्या दुकानांतूनही सीलबंद पाण्याच्या बाटल्या विकल्या जाऊ लागल्या आहेत. उन्हाने जीव कासावीस झालेला असताना या थंडगार सिलबंद पाण्याचा एक घोट जरी घशाखाली उतरला तरी स्वर्गीय सुखाचा अनुभव येतो. सीलबंद पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे सीलबंद पाणी विकणाऱ्या कंपन्याही गावोगावी तयार होऊ लागल्या आहेत. पारदर्शक प्लास्टिक बाटलीत पाणी भरून त्यावर सील असलेले बूच लावले आणि त्यावर कंपनीचे लेबल चिकटवले कि ती बाटली २० रुपयांना कोणीही विकत घेतात. ज्या बिस्लेरी कंपनीने या सीलबंद पाण्याची संकल्पना लोकांमध्ये रुजवली त्या बिस्लेरी पाण्याच्या बाटल्या आज पाहायला मिळणेही दुरापास्त झाले आहे. बिस्लेरी मागितल्यावर आज दुकानदाराकडून सीलबंद पाण्याची कोणत्याही कंपनीची बाटली हाती थोपवली जाते. या सर्वच कंपन्या शासनमान्य असतात का ? यांच्या पाण्याची गुणवत्ता शासनाच्या अन्न आणि औषध विभागाने तपासलेली असते का ? यांच्याकडे त्याबाबतचे प्रमाणपत्र असते का ? एसटीने प्रवास करताना दर दोन गावांच्या नंतर वेगळ्या कंपनीची सीलबंद पाण्याची बाटली पाहायला मिळते. लांबच्या प्रवासात रेल्वे डब्यात पाण्याच्या बाटल्या विकणाऱ्यांकडेही अशाच वेगवेगळ्या कंपन्यांच्या पाण्याच्या बाटल्या दिसून येतात. यामध्ये भरले गेलेले पाणी शासनाने नेमून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार शुद्ध केलेले असते का ? सीलबंद २० लिटर पाण्याच्या बाटला बाबतही तीच परिस्थिती आहे. आजमितीला अनेक कंपन्या, आस्थापने आणि कार्यालये यांमध्ये कर्मचाऱ्यांना पिण्यासाठी शुद्ध पाण्याचे २० लिटरचे बाटले मागवले जातात. रिकामे झालेले बाटले वॉटर सप्लायर्स घेऊन जाऊन दुसऱ्या दिवशी त्याच बाटलांमध्ये पाणी भरून आणतात. ८० ते १०० रुपये प्रति बाटला दराने भरून आणलेले हे पाणी शुद्धीकरण प्रक्रिया करून आणलेले असते कि थेट नगरपालिकेच्या नळातून भरलेले असते याची खात्री कोण करतं ? पुन्हा पून्हा वापर केला जाणाऱ्या या बाटलांना काही वेळा खालून शेवाळे लागलेले पाहायला मिळते, हे बाटले किती वेळा वापर केल्यावर नष्ट करावेत याबाबत सीलबंद पाणी विकणाऱ्या आणि खरेदी करणाऱ्यांना माहिती असते का ? आज भ्रष्टाचार दिल्लीपासून गल्लीपर्यंत मुरला आहे. सीलबंद पाण्याच्या बाटल्या बनवणाऱ्या कंपन्या याबाबतीत मागे राहतील का ? ग्राहकांकडून घेतलेल्या पैशांच्या मोबदल्यात त्यांना दिले जाणारे पाणी शुद्ध नसेल, तर ती केवळ ग्राहकाची फसवणूकच नव्हे, तर ग्राहकाच्या आरोग्यालाही अपायकारक ठरू शकते. सध्याच्या उन्हाळ्याच्या दिवसांत तहान लागल्यावर आपण जवळपास कुठे थंड पाण्याची बाटली विकत मिळते का ते शोधू लागतो. मिळाल्यावर ती कुठल्या कंपनीची आहे, त्या बाटलीवरील लेबलवर ट्रेडमार्क आहे का ? बाटलीवर एक्सपायरी डेट लिहिलेली आहे का ? लिहिली असल्यास ती उलटून तर गेली नाही ना ? पाणी विकणारी कंपनी शासनमान्य आहे का याबाबत कोणतीही खात्री न करता आपण तिचे बूच उघडून ती तोंडाला लावतो, हे आपण जागरूक ग्राहक नसल्याचेच लक्षण आहे. आरोग्य राखण्यासाठी घेतलेली पाण्याची बाटली आरोग्य बिघडवणारी ठरू नये यासाठी प्रत्येकाने सतर्क राहायला हवे. दिवाळी जवळ आली कि शासनाच्या अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे अधिकारी ठिकठिकाणी मिठाईच्या उत्पादकांवर धाडी मारून माव्याची तपासणी करतात. नकली मावा तयार करणाऱ्यांवर कारवाई करतात अशाच प्रकारची तपासणी उन्हाळयाच्या दिवसांत सीलबंद पाणी विकणाऱ्या कंपन्यांच्या कारखान्यांमध्येही करायला हवी !

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

पान १ वरून पुढे...

## भाषण करतानाच...

सुरूवात केली होती. जरांगे यांची प्रकृती थांबावल्याने कार्यकर्त्यांची मोठी धांदल उडाली. बीडमध्ये मोठी खळबळ उडाली होती. कार्यकर्त्यांनी तातडीने जरांगेंना रूग्णालयात दाखल केलंय. तिथे त्यांच्यावर उपचार सुरू असल्याचं समोर येतेय. देशमुख यांच्या हत्येचा घटनाक्रम सांगताना व्यासपीठावर मनोज जरांगे पाटील अन् धनंजय देशमुख, उपस्थित महिला असे सगळेच गहिवरले होते. यावेळी भावावरील अन्याय सांगताना धनंजय देशमुख यांना अश्रू अनावर झाले होते. संतोष देशमुख हत्याकांडातील आरोपी फासावर जाईपर्यंत शांत बसणार नाही. मराठा समाजाने कायम एकजूट ठेवावी, असं आवाहन मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज बीडमध्ये केलंय.

## आष्टीत आ.सुरेश...

प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, यशवंत खंडागळे, एन.टी. गर्जे, बाळू शेठ मेहेर, संजय मेहेर, सेवा निवृत्त नायब तहसीलदार सलीम शेख, नूसरत बेग, टाटा बेग, बब्बुशेठ अत्तार, अज्जू भाई, अस्लम बेग, रिहान बेग, समीर बेग, अज्जू तासकंद, नगरसेवक इर्शन खान, समीर शेख, नगरसेवक शरीफ शेख, इम्रान तांबोळी, शाकिर कुरेशी, शफी कुरेशी, समीर सय्यद, नगरसेवक किशोर झरेकर, चिंटू अग्रवाल, सादिक कुरेशी, रज्जी बेग, पत्रकार जावेद पठाण,सलीम कुरेशी, प्रविण कदम, अँड.रियाज शेख, सय्यद अय्याज, रहीम शेख, पत्रकार आदी हिंदू-मुस्लिम बांधव मोठया संख्येने या इफ्तार पार्टीला उपस्थित होते.

पान १ वरून पुढे...

## अजित पवारांनी...

अधिकारी आदित्य जीवने, अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे, शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आदींची उपस्थिती होती. २०१५ पासून २०१६, २०१९ २०२२-२३ या सालात शासनाच्या विविध विभागांत भरत्या झाल्या. त्यासह जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या अंतरजिल्हा बदली. पदोन्नती, अनुकंपा भरती करताना बिंदूनामावलीचे पालन झाले का, याची माहिती घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.

आठ एप्रिलला पुढची बैठक- दरम्यान, विभाग प्रमुखांना वरील माहिती गोळा करण्याचे निर्देश दिलीप गावडे यांनी दिले आहेत. याबाबत आता ता. आठ एप्रिलला बैठक होणार आहे. याचा अहवाल महिन्यात शासनाला सादर केला जाणार आहे. त्यानंतर निर्णय होणार आहे.

## अवघ्या 5 तासांत...

ठेवत अवघ्या पाच तासांत तपास पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. सामान्यतः पोलीस प्रक्रिया दीर्घ आणि वेळखाऊ असते, मात्र परळी पोलिसांनी अवघ्या काही तासांत गुन्हा नोंदवून, तपास करून, आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करत एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. या प्रकारामुळे परळी पोलिसांची तत्परता आणि कार्यक्षमतेवर नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी अशी वेगवान आणि कठोर कारवाई होणे गरजेचे असल्याचे स्थानिक नागरिकांनी नमूद केले.

पान १ वरून पुढे...

परळी पोलिसांच्या या कार्यक्षमतेचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, भविष्यातही अशीच जलद आणि प्रभावी कार्यवाही पाहायला मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे...

## भगवंताच्या स्मरणात...

महापुराण कथेत चौथ्या दिवशी भव्य श्री शंभू महादेव -पार्वती विवाह सोहळा संपन्न झाला.

भव्य संगीतमय श्री शिव महापुराण कथा चालू असून यामध्ये चौथ्या दिवसाच्या कथेमध्ये शंभु महादेव-पार्वती यांचा विवाह सोहळा थाटात झाला. यावेळी शंभू महादेवाचा -पार्वतीचा पोशाख केलेल्या पात्रांनी उपस्थितांची मने वेधून घेतली. या कथेतील विवाह सोहळ्यासाठी पुरुषांसह महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. शहरातील सावता नगर येथे भव्य संगीतमय श्री शिव महापुराण कथेची सुरुवात सिद्धेश्वर मंदिराजवळ सोमवार दि. २४ रोजी झाली असून कथा प्रवक्ते ह.भ.प. श्रीहरी महाराज रसाळ यांच्या मधुर वाणीतून शिवपुराण कथेतील भगवान शंभु महादेवाच्या अनेक आध्यात्मिक लिलाचे वर्णन केलें. या जीवनाचेच दुसरे नाव संघर्ष आहे. जीवनात संकटे येणं स्वाभाविक आहे. दु:खाचा अंध:कार दूर झाल्यानंतर सुख प्राप्ती होते. जीवनात सुख-दु:ख येतच असतात. यासाठीकोणताही परिस्थिती उद्धवल्यास घाबरण्याचे कारण नाही. कधी-कधी मनुष्य जेव्हा संकटांच्या कचाट्यात सापडतो तेव्हा तो परमेश्वराला विसरल्यानेच त्याच्यावर ही परिस्थिती ओढवलेली असते. तेव्हा तो दु:खी होतो आणि आपल्या नशीबालाच दोष देत राहतो. परमेश्वरालाच वाईट म्हणतो.

पान १ वरून पुढे...

माणसाच्या जीवनात जे सुख दु:खाचे प्रसंग येतात हा भाग्याचा दोष नसून त्याने केलेल्या कर्माचे फळ आहे त्यामुळे भगवंताच्या स्मरणात सुख शांती समाधान नांदत असते. शंभू महादेवांच्या कृपेने अनेकांच्या अडचणीचा सामना सहज सोपा झाला शिवपुराण या कथा श्रावणात सर्वात मोठी शक्ती आहे. भगवान शंभू महादेवाच्या भक्तीतून अनेक महिला मंडळ जिवापाड श्रद्धा ठेवतात असे प्रतिपादन ह भ प कथा प्रवक्ते श्री. हरी महाराज रसाळ यांनी व्यक्त केले.यावेळी परिसरातील महीला पुरुष लहान थोर मंडळींनीही अतिशय उत्साहाच्या वातावरणामध्ये हा विवाह सोहळ्यामध्ये महिला व पुरुष बांधवांनी सहभाग घेतला. सकाळच्या सत्रातील ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणास ही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद असून ज्ञानेश्वरी पारायण व कथेची सांगता सोमवार दि. ३१ मार्च रोजी होणार आहे. ह.भ.प. श्रीहरी महाराज रसाळ यांचे काल्याचे किर्तन होणार असून महाप्रसादने कथेची सांगता होणार आहे. या श्री शिव महापुराण कथेचा पंचक्रोशीतील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सर्व आयोजन कमिटीच्या वतीने वतीने करण्यात आले आहे.

## बालविवाहप्रकरणी...

विवाह करीत शारीरिक संबंध ठेवले. अशी तक्रार पीडित मुलीने दिल्यावरून बालाजी शाहू लांडगे, विलास पांढरे, तिची आई या तिघांविरुद्ध केज पोलिसात बलात्कार, पोस्को, बालविवाह प्रतिबंधक कायदा, अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील

पान १ वरून पुढे...

तपास सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना हे करीत आहेत.

**मुलीला फूस लावून पळवून आणल्याचे आईचे म्हणणे**- पीडित मुलीची आई व तिच्यासोबत लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत असलेला विकास पांढरे हे पैठण येथे मेस चालवितात. तेथे बालाजी लांडगे हा कंपनीत काम करीत असलेला तरुण त्यांच्या मेसवर जेवायला जात असे. त्याची ओळख या पीडित मुलीशी झाली. या ओळखीतून त्याने तिला फुस लावून पळवून आणले. म्हणून मुलीचा शोध घेण्यासाठी २७ मार्च रोजी मुलीची आई, विलास पांढरे व तिचे दोन लहान भावंडे हे लांडगे याच्या शेतात आले होते. त्यांना त्या मुलाचे नातेवाईक यांनी मारहाण केली. त्यामुळे ते सर्वजण भीतीने रात्री चिंचोली माळी पाटीजवळ अंधारात लपून बसले. त्यांनी मदतीसाठी पोलिसांना ११२ क्रमांकावर संपर्क साधला. त्यानंतर केज पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक वैभव पाटील यांच्या आदेशावरून सहाय्यक पोलिस निरीक्षक वैभव मांजरमे, जमादार उमेश आघाव, सहाय्यक फौजदार शंभुदेव दराडे यांनी जाऊन त्यांची व त्या मुलीची सुटका करीत ठाण्यात आणले.

## 'भुजल पातळी ...

समवेत शिवसेना जिल्हा समन्वयक संजय भाई महाद्वार, जिल्हा सहसंघटक रतन गुजर, उपजिल्हाप्रमुख राजु महुवाले, बीड विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे, सरपंच प्रदीप कोठुळे, बंटी परदेशी, दिलीप पवार, बाळू वैद्य, व आदी पदाधिकारी उपस्थित होते.

पान ४ वरून पुढे...

## वडवणीत हिंगलाज...

त्यानंतर श्रीहिंग्लज मातेची पालखी मिरवणूक (शोभा यात्रा )संपूर्ण शहरात सर्व समाज बांधव, महिला , युवक यांच्या उपस्थित वारकरी श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी शिक्षण संस्था येथील सर्व वारकरी बाल भजनी मंडळाच्या उपस्थितीमध्ये ज्ञानोबा- तुकाराम, हिंगलाज माता की जय घोषणा देत व चोका -चौकात फटाक्यांची आतिषबाजी, फुगड्या चा आनंद घेत भक्तीमय वातावरणात पालखी मिरवणूक काढण्यात आली मिरवणूक नंतर१२:३०वाजता हिंगलाज मातेची महाआरती महाप्रसाद चे यजमान श्री ह.भ.प. ज्ञानोबा(माऊली) जर्नादन बेदरकर महाराज व प्रकाश सुखदेव गार्डी यांच्या हस्ते करण्यात आली. दुपारी एक ते चार या वेळेत महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला. हिंगलाज माता प्रकट दिनानिमित्त विविध कार्यक्रमास भावसार समाज बांधव , शहरातील प्रतिष्ठित नागरिक, राजकीय, सामाजिक, क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार , मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पवनचक्की कंपन्यांची...

कंपन्यांच्या पाळलेल्या गुंडानी हिसकावून घेत शिविगाळ करत धमकावल्याचा प्रकार घडला असुन यामुळे शेतकऱ्यांमध्ये दहशतीचे सावट पसरले असुन पोलिस प्रशासनासमोर जर पवनचक्की कंपन्यांच्या लोकांची मजल पत्रकारांना दमदाटी करण्यापर्यंत जात असेल तर सर्वसामान्य शेतकऱ्यांना किती अडचणीचा सामना करावा लागत असेल असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपस्थित केला असुन जिल्ह्यधिकारी आणि पोलिस अधीक्षक बीड यांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची आवश्यकता असल्याचे म्हटले आहे.

मावेजा न देताच तार ओढण्याचे काम सुरू ; दिड महिन्यांपूर्वी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना लेखी तक्रार करूनही कारवाई नाही : आदमखां पठाण ( पिडीत शेतकरी) बीड तालुक्यातील बोरखेड शिवारातील गट नंबर ५६३ आणि गट नंबर ५७० मधील शेतजमिनीवरून रिन्यु पवनचक्की कंपनीचे उच्च दाब विद्युत तारा ओढण्याचे काम सुरू असुन आमच्या सहमतीविना आणि कोणताही मावेजा न देता काम करत असल्याची लेखी तक्रार दि.२० फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक बीड, उपविभागीय अधिकारी बीड आणि तहसीलदार बीड यांना दिली होती.परंतु त्याची दखल घेण्यात आली नाही. आज पोलिस प्रशासन आणि अतिरीक्त फोर्स आणुन तारा ओढण्याचे काम दुपारी सुरू केल्याने आम्ही सगळे कुटुंबातील दावे आणि पेट्रोल बाटल्या घेऊन टावर वर चढलो होतो.पोलिस प्रशासनाने आम्हाला जबरदस्तीने खाली उतरवले आमचे मोबाईल हिसकावून घेतले. उद्या तुम्हाला मावेजा मिळेल असे म्हणत सध्या पोलीस बंदोबस्तात तारा ओढण्याचे काम सुरू आहे. आमचे संपूर्ण कुटुंब आसिब पठाण,आदम पठाण, नासिर पठाण, रज्जाक पठाण,फातिमा पठाण,अख्तरबी पठाण, पप्पू खान,अन्वर पठाण,तोफिक पठाण सगळे कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

वार्तांकन करताना मोबाईल हिसकावून दमदाटी केली , पोलिस

पान ४ वरून पुढे...

अधीक्षक यांना तक्रार करणार: मुस्तफा पठाण उपसंपादक दैनिक हिंद जागृती आदमखां पठाण यांनी फोन केल्यानंतर वार्तांकन करण्यासाठी मी आलो होतो. पिडीत शेतकरी टावर वर चढले असताना त्याचे व्हिडिओ शूटिंग मी करत असताना पवनचक्की कंपन्यांचा शेवाळे नावाच्या माणसाने माझ्या गळ्यात पत्रकाराचे ओळखपत्र असतानाही माझा मोबाईल हिसकावून घेतला आणि तु इथं कशाला आला ?? तुम्हाला फार माज चढलाय ; कशाला बातम्या करता अशा प्रकारे दमदाटी केली.याप्रकरणी आम्ही पत्रकार संघटना पोलिस अधीक्षक बीड यांना लेखी तक्रार करून लेखणी बंद आंदोलन करणार आहोत. पत्रकारांवर दडपशाही आम्ही खपवून घेणार नाही.

उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवणे आवश्यक : डॉ.गणेश ढवळे तालुका स्तरावर ऊर्जा कंपनी संदर्भात संनियंत्रण समितीचे अध्यक्ष उपविभागीय अधिकारी तर सचिव तहसीलदार असतात. शेतकऱ्यांच्या तक्रारीची दखल घेत शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत तंटा होऊ नये यासाठी प्रयत्न करणं आवश्यक आहे.मात्र जिल्हा प्रशासन याबाबत उदासीन असुन पवनचक्की कंपन्यांनी सशुल्क पोलिस संरक्षण घेऊन शेतकऱ्यांवर दबाव आणणे, दडपशाही करणे सुरूच असुन जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक बीड यांनी दखल घेणे गरजेचे असल्याचे मत डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केले.

## तलावातील मोटारी...

आहे. यात गेवराई , माजलगाव व परळी या तालुक्यांचा समावेश होतो . जिल्ह्याचे हवामान सर्वसाधारणत: उष्ण व कोरडे आहे . उन्हाळा मोठा व कडक असतो तर हिवाळा कमी कालावधीचा पण सौम्य असतो . मे महिन्यात तापमान महत्तम असते . डिसेंबर महिन्यात तापमान कमीतकमी असते . उन्हाळ्यात दिवसा तापमान बरेच वाढत असले तरी रात्री ते कमी होते . जिल्ह्याच्या पश्चिम भागातील उंचावरील बालाघाट डोंगराळ प्रदेशातील हवामान काहीसे थंड आहे तर सखल भागात ते उबदार व थोडेसे दमट आहे . अंबेजोगाई तालुक्यातील हवामान आल्हाददायक असल्याचे दिसून येते . जिल्ह्यात जून ते सप्टेंबर या कालावधील पाऊस पडतो . पावसाचे प्रमाण अतिशय कमी असून पाऊस अनियमित स्वरूपाचा आहे . त्यामुळे जिल्ह्याचा बराचसा भाग अवर्षणग्रस्त आहे . जो पाऊस पडतो त्याचे जिल्ह्यातील वितरणही असमान आहे . पावसाचे प्रमाण पूर्वेकडून पश्चिमेकडे कमी होत गेलेले आढळून येते . जिल्ह्याच्या पूर्वेकडील अंबेजोगाई , केज , माजलगाव , परळी , धारूर आदी तालुक्यात तो तुलनात्मकदृष्टया अधिक पडतो तर गेवराई , आष्टी , पाटोदा , शिरूर यांसारख्या तालुक्यात तो अधिक कमी पडतो . जिल्ह्यातील गेवराई , पाटोदा , बीड , माजलगाव, केज , आष्टी या तालुक्यांचा केंद्र शासनाने निश्चित केलेल्या अवर्षणप्रवण क्षेत्रात समावेश होतो . येथील लोक दुष्काळाचा सामना करतात . बीड जिल्ह्यात विहिरी, कूपनलिका व नद्या ही पाणीपुरवठ्याची मुख्य साधने आहेत . जिल्ह्यात बीड व आष्टी या भागात विहिरी तुलनात्मकदृष्टया अधिक आहेत . बीड शहरास माजलगाव तलाव व बिंदुसरा तलावातून पाणी पुरवठा होतो . दुष्काळग्रस्त क्षेत्रे : मराठवाड्यातील बहुतांश भागांप्रमाणेच बीड जिल्हाही दुष्काळग्रस्त

पान ४ वरून पुढे...

म्हणून वर्गीकृत आहे , ज्यामध्ये पाण्याची घटणारी पातळी ही एक मोठी समस्या आहे . काही भागात भूजल पातळीत लक्षणीय घट झाली आहे तर काही तालुक्यांमध्ये पाण्याच्या पातळीत घट होत आहे . २०२१ च्या पावसाळ्यात बीडसह मराठवाड्यात भूजल पातळीत लक्षणीय वाढ झाली . अलीकडील २०२३ मधील आकडेवारीवरून महाराष्ट्रातील काही भागात भूजल संकट वाढत असल्याचे दिसून येते . १६ जिल्ह्यांमध्ये भूजल पातळीत लक्षणीय घट होत आहे .

जिल्ह्याच्या ईशान्य भागात ( गेवराई आणि बीड तालुक्यांचा काही भाग ) आणि आग्नेय भागात (अंबेजोगाई आणि परळी तालुक्यांचा काही भाग ) पाण्याच्या पातळीत घट होत आहे .

माजलगाव धरणातील पाण्याची पातळी २०२३ मध्ये अत्यंत कमी होती , मागील वर्षी ५६.४२ % च्या तुलनेत फक्त १४.२३ % साठा होता . जिल्ह्याच्या पश्चिम भागात ( आष्टी तालुक्यात ) देखील पाण्याच्या पातळीत घट होत आहे . काही भागात नायट्रेट दूषिततेमुळे भूजलाची गुणवत्ता प्रभावित होते तर ५० % भूजल नमुन्यांमध्ये दूषितता दिसून येते . सरकारने जलसंवर्धन प्रकल्पांमध्ये गुंतवणूक केली आहे , ज्यामध्ये बंधारे बांधणे आणि सूक्ष्म सिंचन व्याप्ती वाढवणे समाविष्ट आहे . तथापि एकंदरीतच बीड जिल्ह्यात बागायती क्षेत्र कमी आहे .

बीड तालुक्यातील मौजे काकडहिरा येथील तलावामधून काकडहिरा व तळेगाव या दोन गावांना पाणीपुरवठा करण्यात येतो . यावर्षी पाऊस मोठ्या प्रमाणात झाल्याने सदरचा तलाव ओसंडून वाहत होता . परंतु गेल्या दोन ते तीन महिन्यापासून अनेक शेतकऱ्यांनी सदर तलावामध्ये मोटारी टाकून पाणी उपसा सुरु केला होता . त्यामुळे तलावातील पाणी पातळी झपाट्याने कमी झालेली दिसून आली व हा उपसा असाच चालू राहिला तर गावातील जवळपास ३००० जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न व काकडहिरा तसेच तळेगाव येथील नागरिकांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न निर्माण होऊन भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागेल अशी शक्यता निर्माण झाली . भविष्यात निर्माण होणारी पाणीटंचाई कमी करण्यासाठी प्रशासनातर्फे तळ्यातील मोटारी काढून घेण्यात आल्या . शेतकऱ्यांनीही प्रशासनास सहकार्य केले . यानिमित्त बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी तालुक्यातील जनतेस आवाहन केलेले आहे की जे उपलब्ध पाणी आहे , ते सांभाळणे आवश्यक आहे . अवैधरित्या तलावात मोटरी टाकणे आणि पाण्याचा उपसा करणे ही बेकायदेशीर बाब आहे . अशा मोटारी जप्त करण्यात येतील आणि कायदेशीर कारवाई केली जाईल . त्यामुळे कोणीही अवैधरित्या पाण्याचा उपसा करू नये .

## बुद्धगया महाबोधी...

बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे यासाठी बी.टी.एम. क्ट १९४९ हा कायदा रद्द करावा या मागणीसाठी संपूर्ण जगभर व संपूर्ण भारतभर आंदोलन चालू आहे हे विहार बुद्धांनी समतेची क्रांती केली व प्रतिक्रांतीनंतर ब्राह्मन महंतांनी त्यावर कब्जा मिळविला ते बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे यासाठी सर्वप्रथम इ.स. १८१८ मध्ये भंते अनागरिक धर्मपाल यांनी आंदोलन केले व ते अनेक वर्ष चालू राहिले आणि त्याचा परिपाक म्हणून बिहार टेम्पल ऍक्ट १९४९ हा कायदा आणून त्यामध्ये चार बौद्ध भिक्षू चार

पान ४ वरून पुढे...

ब्राह्मण पुजारी व त्या विहाराचा अध्यक्ष हा बुद्धगया जिल्ह्याचा कलेक्टर जो की हिंदू धर्मीय ब्राह्मणच असला पाहिजे आणि तो जर ब्राह्मण नसेल तर इतर चार ब्राह्मणांपैकी कोणीतरी अध्यक्ष असावा असा हा जाचक १९४९ चा बी टी एम क्ट आहे. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोंबर १९५६ साली बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर भारतातील बौद्ध धर्मात वाढ होऊन समाज जागृत झाला व भारत स्वतंत्र झाल्यानंतर संविधान लागू झाले आणि संविधानात स्पष्ट उल्लेख आहे की १९५० पूर्वीचे भारतातील जे जुने कायदे आहेत ते रद्द समजण्यात आले असून भारताच्या संविधानानुसार भारतातील सर्व कायदे व कानून लागू झालेली आहेत. त्याच तत्वावर बिहार राज्यातील बिटी ऍक्ट ४९ रद्द करावा यासाठी माजलगाव जिल्हा बीड येथील बुद्धगया महाबोधी महाविहार आंदोलन कृती समिती ची स्थापना होऊन समितीचे अध्यक्ष विजय साळवे यांनी ही माहिती सांगितली व बी.टी.एम.क्ट १९ ४९ हा बिहार राज्यात जाचक कायदा लागू असल्याने बुद्ध धर्मियांच्या संपूर्ण ताब्यात आलेली नाही म्हणून हे महाविहार संपूर्ण बौद्ध धर्मीयांच्या ताब्यात द्यावे यासाठी भारतात प्रत्येक राज्यात आंदोलन चालू आहे व माजलगाव येथे सुद्धा गेल्या ०५ मार्च २०२५ रोजी तहसील कार्यालयासमोर संपूर्ण हजारो बौद्ध धर्मीयांच्या वतीने तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले व दिनांक २८ मार्च २०२५ रोजी रास्ता रोको आंदोलन याच मागणीसाठी माजलगाव मध्ये करण्यात येणार होते परंतु जमावबंदी आदेश बीड जिल्ह्यात लागू असल्यामुळे तो रास्ता रोको रद्द करून पत्रकार परिषदेत हे सांगून रास्ता रोको पुढे करण्यात येणार आहे अशी माहिती बुद्धगया महाविहार आंदोलन कृती समितीचे अध्यक्ष विजय साळवे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली तर बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी हे विहार मुक्त करण्यासाठी केवळ भारतातच नव्हे तर जगभरात अमेरिका, इंग्लंड थायलंड अशा अनेक देशात आंदोलने चालू आहेत परंतु त्याच्या बातम्या बाहेर देशातील न्यूज चैनल दाखवतात परंतु भारताचे दुर्दैव न्यूज चैनल या बातम्या दाखवत नाहीत तर भारतातीलच आंदोलनाच्या बातम्या सुद्धा ही चैनल वाले दाखवत नाही तर या कृती समितीचे ज्येष्ठ नेते दयानंद भाऊ स्वामी यांनी सांगितले की आपल्या प्रिंट मीडियाने आतापर्यंत आम्हाला अनेक आंदोलनामध्ये मग ते भूमिहीन आंदोलन असेल गायरान जमिनीचे आंदोलन असेल नामांतराचे आंदोलन असेल त्या प्रत्येक आंदोलनात आपल्या पत्रकार बांधवांनी आम्हाला सहकार्य केलेले आहे व बातम्यांना चांगली प्रसिद्धी दिली आहे पुढेही आपले सहकार्य करावे असे आवाहन केले या पत्रकार परिषदेचे प्रास्ताविक ज्येष्ठ नेते कचरू खळगे यांनी केले यांप्रसंगी अंकुशराव जाधव सचिन उजगरे बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष एस बी मोरे धम्मानंद साळवे डॉ श्रीराम खळगे पांडुरंग जाधव ड. रवींद्र टाकणखार.दीपक टाकणखार यांच्यासह बुद्धगया महाबोधी महाविहार आंदोलन कृती समितीचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते

## महात्मा बसवेश्वर...

आंबेडकर सामाजिक न्याय भवन. तिसरा मजला, बीड येथे विहित नमुन्यात दाखल करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण चे सहाय्यक संचालक बीड यांनी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मुंबईतल्या 'या' कॉलेजमध्ये झाली १०० % प्लेसमेंट! सरासरी पगार ४७ लाख तर दोघांना ५४ लाखांचं पॅकेज

**मुंबई । प्रतिनिधी**

शैक्षणिक कारकिर्दीमध्ये पदवी शिक्षणाचा टप्पा अनेकांसाठीच महत्त्वाचा असतो. कारण हा तोच टप्पा असतो जिथून अनेकांसाठी पुढं नोकरीच्या संधी वाट पाहत असतात. अशाच या अतिशय महत्त्वाच्या टप्प्यावर असणाऱ्या मुंबई शहरातील एका प्रतिष्ठीत संस्थेच्या विद्यार्थ्यांना लाखोंचं वार्षिक पॅकेड असणारी दणदणीत पगाराची नोकरी लागली आहे. आकर्षणाची बाब म्हणजे या संस्थेत यंदाच्या वर्षी १०० टक्के प्लेसमेंट झाली असून, यामध्ये ॲक्सेंचर, मायक्रोसॉफ्ट अशा जागतिक स्तरावरील मोठ्या कंपन्यांनी विद्यार्थ्यांना नोकरीसाठी विविध पदांवर निवडलं आहे. या कॅम्पस प्लेसमेंटमध्ये ॲक्सेंचर या कंपनीनं ४१ विद्यार्थ्यांना ४५ लाख ३७ हजार रुपयांचं पॅकेज दिलं आहे.

सरासरी ४७ लाखांचे पगार या कॅम्पस प्लेसमेंटमध्ये कंपन्यांनी विद्यार्थ्यांना दिले असून, मायक्रोसॉफ्ट कंपनीनं दोन विद्यार्थ्यांना तब्बल ५४ लाखांचं पॅकेज



देऊ केलं आहे. आयआयएम मुंबई असं या शैक्षणिक संस्थेचं नाव असून, पवईतील इंन्स्टीटयूट ऑफ इंडस्ट्रीअल इंजिनिअरिंग संस्थेचं साधारण दीज वर्षापूर्वी आयआयएममध्ये रुपांतरण झालं आणि तेव्हापासूनच इथं येणाऱ्या विद्यार्थ्यांचा ओघ वाढला. यंदाच्या वर्षी इथं कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी १९८ राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांची रांग लागली होती. यामध्ये सर्वात कमी पकेजची ऑफर ही १८ लाख रुपयांची होती अशीही माहिती समोर आली आहे.

**ऑफरची संख्या आणि पगाराच्या आकड्यात वाढ**

मागील वर्षाच्या तुलनेत विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या या प्लेसमेंटची संख्या १० टक्क्यांनी वाढली असून या प्रक्रियेत नोकरीसाठी निवडलेल्या जवळपास २० टक्के विद्यार्थ्यांना नोकरीचा कोणताही अनुभव नाही. विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या पगाराच्या आकड्यात सरासरी ५ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

IIM Mumbai मध्ये यंदाच्या वर्षी हेल्थकेअर आणि फार्मा क्षेत्रातील नोकऱ्यांची संख्या १३० टक्क्यांनी वाढली असून, रिटेल आणि ई कॉमर्स क्षेत्रातील नोकऱ्यांची संख्या ४७.७३ टक्के इतकी आहे. लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे या प्लेसमेंटमध्ये आयटी क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये घट झाल्याची बाब नोंदवण्यात आल्यामुळं एकंदरच नोकरी क्षेत्रासह तरुणाईचा ओघ नेमका कोणत्या दिशेनं जात आहे याचाही अंदाज येत आहे.

## अग्नीवीर सैन्य भरतीसाठी ऑनलाईन नोंदणी

**बीड । प्रतिनिधी**

अग्निपथ योजनेअंतर्गत वर्ष २०२५-२०२६ साठी होणाऱ्या अग्नीवीर भरतीसाठी अविवाहित पुरुष, अविवाहित महिला उमेदवारांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यासाठीची अधिसूचना www.joinindianarmy.nic.in वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ऑनलाइन अर्ज स्वीकारण्याची तारीख १२ मार्च ते १० एप्रिल २०२५ आहे. सामान्य प्रवेश परीक्षा संभवतः जून महिन्यात प्रसिद्ध करण्यात येईल. हे भरती अर्ज आहिल्यानगर, बीड, लातूर, धाराशिव, पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील उमेदवार १२ मार्च १० एप्रिल २०२५ पर्यंत भरू शकतात. तरी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी या संधीचा लाभ घेऊन दिनांक १० एप्रिल २०२५ पूर्वी नोंदणी करावी, असे आवाहन कर्नल शरद पांढरे (नि.) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी बीड यांनी केले आहे.

## पीएम श्री.मा.शाळा पालीच्या वतीने विद्यार्थ्यांचे आहार व आरोग्य विषयाचे व्याख्यान संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

शुक्रवार रोजी बालगंधर्व सभागृहात व्याख्यान मौजे पीएम श्री.मा.शाळा पाली यांच्या वतीने विद्यार्थ्यांचे आहार व आरोग्य या विषयाचे व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री.लाड सर हे होते तर प्रमुख वक्त्या म्हणून महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य श्रीमती डॉ.संध्या आयस्कर या लाभल्या होत्या. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्राचार्य श्रीमती डॉ.संध्या आयस्कर यांनी शिशुवर्गापासून ते किशोरवयीन विद्यार्थ्यां पर्यंतआहार व आरोग्य याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती काब्दे एस. व्ही. यांनी केले तसेच सूत्रसंचलन श्री राठोड सर व आभार प्रदर्शन श्री तळेकर सरांनी केले कार्यक्रमाला विद्यार्थी शिक्षकांसह शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# माजी जि प सदस्य मा श्री सुरेश हात्ते यांच्या इफ्तार पार्टीला उस्फुर्त प्रतिसाद

## सुरेश हात्ते यांनी दिल्या मुस्लिम बांधवांना शुभेच्छा

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील मुस्लिम समाजाच्या पवित्र रमजान निमित्ताने माजी जिल्हा परिषद सदस्य माननीय श्री सुरेश हात्ते साहेब यांच्या वतीने तलवाडा येथे मरकज मज्जित मध्ये रोजा इफ्तार पार्टीला हिंदू आणि मुस्लिम बांधवांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी माननीय श्री सुरेश हात्ते साहेब मा श्री प्रकाश हात्ते मा श्री अनिल हात्ते डॉ अनिकेत हात्ते अजय हात्ते यांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या आजच्या या इफ्तार पार्टीला मुस्लिम बांधवांसोबत हिंदू बांधवही मोठ्या संख्येने उपस्थित होते माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश रावजी हात्ते साहेब यांच्या वतीने सालाबाद प्रमाणे मुस्लिम समाजाच्या पवित्र रमजान निमित्ताने रोजा इफ्तार पार्टीचे




भव्य आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी उपस्थित तलवाडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक माननीय श्री सोमनाथ जी नरके साहेब व पोलीस उपनिरीक्षक माननीय श्री कोळी साहेब तलवाडा गावचे उपसरपंच माननीय श्री आज्जू भाई सौदागर माननीय श्री बाबूआप्पा शेटे तलवाडा गावचे माजी सरपंच मोबीन भाई खतीब माननीय श्री थोरात साहेब माननीय श्री बगाडे साहेब माननीय श्री नजीर भाई कुरेशी माननीय श्री राजाभाऊ खिस्ते माननीय श्री दत्ता हात्ते माननीय श्री शेख नूर भाई पत्रकार बापू गाडेकर पत्रकार सुभाषराव शिंदे पत्रकार आर आर आबा पत्रकार अल्ताफ भाई कुरेशी दादा काकडे साहेब दत्ता शिंगणे मा श्री विठ्ठल भाऊ हात्ते मा श्री बाबुराव शिंगणे मा श्री विकास नाना हात्ते माननीय श्री सुनील दादा नाटकर माननीय श्रीकृष्ण कावळे टेलर माजी सरपंच राधाकिशन महाराज शिंगणे माननीय श्री बाबासाहेब आठवले व रोजदार मुस्लिम बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

## माजलगाव येथे सैलानी बाबा संदल, यात्रा उरूसचे आयोजन

## सैलानी बाबा दर्गा : हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहराजवळील असलेल्या ढोरगाव-हिंगणवाडी शिवारात सैलानी बाबा यांचे दर्गा परिसर येथे दिनांक ०२ एप्रिल वार बुधवार रोजी सैलानी बाबा संदल व उरूसचे आयोजन करण्यात आले आहे. याचा लाभ भक्तांनी घ्यावा असे आवाहन यात्रा महोत्सव समितीचे अध्यक्ष विशाल गायकवाड यांनी केले आहे.या दर्ग्याच्या दर्शनासाठी जिल्हा व राज्यभरातून विविध जाती धर्मातील भाविकांची मोठी उपस्थिती दरवर्षी असते. सकाळी ०९ ते सायंकाळी १० वाजेपर्यंत भाविक भक्तांचि दर्शनासाठी आलोट गर्दी पाहायला मिळते. व तसेच महाप्रसादाचा कार्यक्रम सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५ वाजेपर्यंत राहील. ढोरगाव



हिंगणवाडी शिवारात असलेल्या सैलानी बाबा यांच्या दर्यात दरवर्षी पाडव्या नंतर तीन-दिवसांनी संदल चे आयोजन करण्यात येते मागील अनेक वर्षापासून ही परंपरा सुरू आहे. मा. बाबुदादा राजेभाऊ गायकवाड पुजारी मोगरेकर फरशी कारखान्याजवळ, देवखेडा नांदुर, माजलगांव जि.बीड यांच्या घरून दि.०२ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी संदल बायपासने निघुन आंबेडकर चौकातून त्याच दिवशी रात्रौ ९.३० वाजता सैलानी बाबांच्या दर्गा येथे पोहचते. यूसुफ कादरी, आगा खाँन साहाब, शेख महेबुब, रईस बाबा कादरी, शेख मुस्तकीम बाबा, सय्यद रफीक कादरी, पुजारी परिवाराच्या व ईतर मान्यवरांच्या हस्ते सैलानी बाबा दर्गाह येथे यावर्षी चादर चढविण्यात येणार आहे व तसेच चादर चढवल्या नंतर सुप्रसिद्ध कव्वाल समीर ताज ( छत्रपती संभाजीनगर) यांचा शानदार कव्वाली चा कार्यक्रम होईल तसेच संदल निमित्त्य दर्शनास सर्व जनतेने यावे असे आवाहन सैलानी बाबा यात्रा महोत्सव समितीचे अध्यक्ष विशाल बाबा गायकवाड यांनी केले आहे.

## श्रीक्षेत्र मच्छिंद्रगडाचा फिरता नारळी सप्ताह नांदेवाली येथे २ एप्रिल रोजी पुष्पवृष्टीने प्रारंभ होणार

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील नांदेवाली येथे श्रीक्षेत्र संस्थान मच्छिंद्रगड निमगाव मायंबा येथील ४७ वा वार्षिक नारळी फिरता अखंड हरिनाम सप्ताह वैकुंठवासी धोंडीराम महाराज यांच्या प्रेरणेने ब्रह्मलीन संत निगमानंद महाराज यांच्या कृपा छत्राखाली महंत स्वामी जनार्धन महाराज यांच्या अध्यक्षतेखाली २ एप्रिल रोजी संत महंत ब्रह्मवंद भाविकांच्या उपस्थितीत पुष्पवृष्टीचा कार्यक्रमाने प्रारंभ होत असून ९ एप्रिल रोजी मच्छिंद्रगडाचे मठाधीपती स्वामी जनार्दन महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे. मौजे नांदेवाली येथे मच्छिंद्रगड चे संस्थापक आध्यक्ष ब्रम्हलीन संत निगमानंद महाराज यांच्या जन्मभुमीत होत असलेला मच्छिंद्र गडाचा फिरता नारळी सप्ताह मध्ये धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे त्यामध्ये पहाटे काकडा भजन ,विष्णुसहस्त्रनाम ,गीता पाठ ज्ञानेश्वरी पारायण ,तुकाराम महाराज गाथा भजन ,रामायण कथा, ज्ञानेश्वरी पारायण ,प्रवचन,हरी किर्तन जागर इत्यादीचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात प्रवचनकार नवनाथ महाराज शास्त्री भालगाव, महंत सुरेशानंद महाराज शृंगारवाडी, महंत हनुमान महाराज शास्त्री मिडसांगवी, महंत भानुदास महाराज शास्त्री गोवळवाडा; महंत अतुल महाराज शास्त्री तागडगाव, महंत उद्धव महाराज शास्त्री नारायणवाडी, हनुमान चैतन्य शास्त्री आळंदी ,यांचे प्रवचन होणार आहे तर कीर्तनकार महंत ज्ञानेश्वर माऊली शिंदे आळंदी, विशाल महाराज खोले मुक्ताईनगर, केशव आप्पा नामदास ,महंत प्रेममुर्ती शिवाजी महाराज नारायणगडकर ,महंत कान्होबा महाराज देहूकर पंढरपूर ,महंत महादेवानंद महाराज शास्त्री भारती पिंपळवंडी, महंत विठ्ठल महाराज शास्त्री गहीनाथगड ,महंत देविदास महाराज शास्त्री नेवासा यांचे कीर्तन होणार आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती टी.ए. आसरकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ५४५/२०२५, शामल वगैरे विरुध्द निरंक**

अर्जदार- १) शामल देविदास धुताडमल, वय ४३ वर्ष, धंदा घरकाम रा. काळा हनुमान ठाणा, चांदणे वस्ती, बीड ता. जि. बीड २) किशोर तुकाराम चांदणे, वय ३४ वर्ष, धंदा मजूरी रा. वरील प्रमाणे

विरुध्द

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत शांताबाई प्र. नामदेव चांदणे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत शांताबाई भ्र. नामदेव चांदणे** यांचा मृत्यु दि. २४/०४/२००८ रोजी सरकारी दवाखाना ता. जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार क श ही मयताची चुलत बहिण असून अर्जदार क. २ हा चुलत भाउ आहे. मयत ही मृत्युसमयी अविवाहीत होती मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचं हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत शांताबाई भ्र. नामदेव चांदणे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २६ माहे मार्च २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०३ मे २०२५.**

**(मार्फत- ॲड. पी. बी. वैरागळ)**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)

क.लिपीक — अधीक्षक, दिवाणी न्यायालय, क.स्तर, बीड

## तालुक्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवा

### फार्मर आयडीसाठी मुदतवाढ द्या यांसह विविध मागण्यांचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम पाटील यांचे तहसीलदार यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

सध्या उन्हाळ्याच्या दिवसात बीड तालुक्यातील ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर होत असून तो प्रश्न तातडीने सोडवण्यात यावा तसेच फार्मर आयडीसाठी मुदतवाढ द्या संजय गांधी, श्रावणबाळ योजनेतील वयोवृद्धांची अंगठे डीबीटी होत नाही म्हणून उपाययोजना कराव्या मागणींसह विविध मागण्यांचे निवेदन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी व शिवसैनिक यांनी तहसीलदार श्री.हजारे यांना दिले आहे.



पुढे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, उन्हाळ्याच्या दिवसात बीड तालुक्यातील आसपासच्या ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होतो त्यामुळे या प्रश्नावर तात्काळ उपाययोजना कराव्यात तसेच शेतकरी बांधवांना फार्मर आयडीसाठी मुदत वाढ द्या ज्यामुळे शेतकर्यांना याचा लाभ घेता येईल तसेच संजय गांधी, श्रावणबाळ योजनेतील वयोवृद्धांची अंगठे डीबीटी होत नाही म्हणून उपाययोजना कराव्यात या मागणींचे लेखी निवेदन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम पाटील यांनी तहसीलदार बीड यांच्याकडे दिले असून आमच्या मागण्या मान्य न केल्यास आम्ही लोकशाही मार्गाने आंदोलन करु असा इशारा देखील देण्यात आला आहे.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**

**गेवराई, जि.बीड येथीलसह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. कौस्तुभ नागेश मराठे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २९४ /२०२५, भागबाई - विरूध्द निरंक,**

ज्याअर्थी मयत नामे किसन तुकाराम घुंबार्डे, दिनांक १५.१०.२०१८ रोजी मौजे गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार - १) भागुबाई भ्र. किसन घुंबार्डे, वय ६१ वर्षे, धंदा घरकाम, रा. दाभाडे गल्ली गेवराई ता. गेवराई जि. बीड, २) नवनाथ पिता किसन घुंबार्डे, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. दाभाडे गल्ली गेवराई ता. गेवराई जि. बीड

गैरअर्जदार- १) दत्ता पिता किसन घुंबार्डे, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. दाभाडे गली गेवराई ता. गेवराई जि. बीड

शासकीय/ निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे **किसन तुकाराम मुंबार्डे रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २७/०३/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **पुढील तारीख** ०२/०५/२०२५

**(मार्फत ॲड.बी.एम.मुळे )**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)

क.लिपीक — सहा. अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, गेवराई

**जाहीर प्रगटन**

तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे पक्षकार **प्रदिप भिमराव काळे**, रा. सावतामाळी चौक, बीड ता. जि. बीड यांनी रेखा राजेंद्र माने, रा. गुंधावाडी ता.जि.बीड यांचे मालकी व ताब्यातील खालील वर्णनाची मिळकत

र.डी.जि.प.बीड सब डि.पं.स. व. ता. बीड पैकी कसबे बीड तरफ खोड जालना रोड येथील नगर परिषद हद्दीचे बाहेरील सर्व्हे नं. १०५/अ मधील प्लॉट क्र. ३५ पुर्ण व प्लॉट क्र. ३६ पैकी असा असुन प्लॉट क्र. ३५ पुर्ण ज्यास ग्रामपंचायत कार्यालय आनंदवाडी मिळकत क्र. ६९४/३५ असा मिळालेला असुन प्लॉट क्र.३५ पुर्ण व ३६ पैकी ज्यांची एकत्रीत लांबी दक्षिणोत्तर ३९ फुट व रुंदी पूर्व पश्चिम ३०.५ फुट ज्याचे एकुण क्षेत्रफळ ११८९ चौ. फुट म्हणजेच ११०.५० चौ.मी. असुन ज्याची चतु:सिमा पुर्वेस २० फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस संजय तावरे व इतरांची जमीन, 'दक्षिणेस प्लॉट क्र. ३४ उत्तरेस प्लॉट क्र. ३६ पैकी

वरील वर्णनाची व चतु:सिमेच्या आतील जमीन/मिळकत आमचे पक्षकाराने मिळकतीचे मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार केलेला आहे व तशी नोटरी नोंदणीकृत इसारपावती केलेली आहे व लवकरच नोंदणीकृत खरेदीखत करुन घेणार आहेत.

वरील वर्णनाची मिळकत ही निर्विवाद तसेच बिनबोजा असल्याचे आश्वासन व विश्वास मिळकतीचे मालक **रेखा राजेंद्र माने** यांनी दिलेला आहे. याउपर मिळकतीमध्ये जर कोणाचे काही हितसंबंध जसे इसारपावती, खरेदीखत, गहाणखत, दान, बक्षीसपत्र, चोळीबांगडी, आममुखत्यारपत्र, कर्ज बोजा, कोर्ट वाद इ. स्वरुपाचे असतील तर संबंधीताने हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत योग्य पुराव्यासह खालील पत्त्यावर आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा काही आक्षेप आला नाही तर सदर मिळकतीचे कायम खरेदीखत करुन घेण्यात येईल व त्यानंतर कोणाचा आक्षेप आला तर त्याचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन.

ठिकाण : बीड

दिनांक : २८/०३/२०२५

**जाहिर प्रगटन देणार**
**प्रदिप भिमराव काळे,**
**रा. सावतामाळी चौक, बीड ता. जि. बीड**
**मो.नं. ९८५०४६१८१५**

**मार्फत**
**ॲड.टि.व्ही. जाधव, बीड**
**जिल्हा व सत्र न्यायालय, बीड**
**मो.नं. ९९२१३७५११८**

CMYK

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

शनिवार, दि.२९ मार्च २०२५ पान ४

## सोमवारी ७ एप्रिल रोजी भ्रष्टाचार निर्मुलन समिती बैठक

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती बीड तथा जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि. ७ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी १०. ३० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्हयातील शासकीय कर्मचा-याविरुध्द प्राप्त होणा-या तक्रारींबाबत पाठपुरावा करण्यासाठी जिल्हास्तरीय भ्रष्टाचार समिती स्थापन करण्यात आली असून त्याअनुषंगाने नागरिकांनी शासकीय अधिकारी, कर्मचा-याविरुध्द भ्रष्टाचारासंबधी तक्रार असल्यास जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीसमोर व्यक्तीश: उपस्थित राहून लेखी स्वरुपात मांडाव्यात सदर तक्रारीसोबत पुरावे जोडले गेले नसल्यास अशा तक्रारी घेतल्या जाणार नाहीत, असे प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# ज्योत्स्ना मॅडम बनु पहात आहेत दिसून आंधळ!

## आमच्या कर्मचाऱ्या विरोधात पुरावे दाखवा सर्वसामान्यावर झाडू लागल्या रुबाब

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजनेवर खाजगी तत्त्वावरील काही कर्मचारी नियुक्त आहेत जसे की इंजिनियर ग्रामसेवक अशा कर्मचाऱ्याकडून सर्वसामान्य जनतेची लूट होत असल्याच्या अनेक तक्रारी आहेत मात्र माजलगावच्या गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक मॅडम दिसून आंधळेपणाचं सॉंग करत असल्याचे दिसत आहे माझ्या कर्मचाऱ्या विरोधात पुरावे द्या तरच आम्ही कार्यवाही करू तुमच्या तोंडी म्हणण्यावर आम्ही विश्वास ठेवायचा कसा असे बोल ऐकत आहेत म्हणजे माजलगाव तालुक्याची पंचायत समिती विना डाग धुतल्या तांदळासारखी आहे की काय? असा प्रश्न पडत आहे इथे कोणीही एक पैसा भ्रष्टाचार करत नाही अशा भागात मॅडम बोलताना दिसतात पंतप्रधान घरकुल आवास योजनेत गंगामसला सर्कल मध्ये अनेक गावात घरकुलाची मागणी करतात तर मंजूर असलेले घरकुलाची हप्ते मी आहे म्हणून इंजिनिअर कडे खेट्या घालतात मात्र इंजिनियर महाशय पैसे घेतल्याशिवाय कामाला हात लावत नाहीत व जा तुझे काम करत नाही काय करायचे ते कर अशी बोलतात तर घरकुल मिळेल की नाही असा प्रश्न पडतो तर तक्रार नाही करावी तर लुट ही पाचवीला पुंजलेलीच आहे गटविकास अधिकारी धुतला मॅडम सारखे लोक स्वतः च्या कर्मचाऱ्यांना रोखला लावणार नसतील तर गोरगरीब सरकारी बाबू समोर टिकू शकेल का? असा प्रश्न पडत आहे त्यामुळे प्रशासनाच्या दुर्लक्षितपणामुळे मागेल त्याला घर या केंद्र सरकारच्या आणि महाराष्ट्र सरकारच्या ब्रीदाला हरताळ फासण्याचे काम होत आहे.

## वडवणीत हिंगलाज माता प्रगटदिन उत्साहात साजरा

**वडवणी । प्रतिनिधी**

भावसार समाजाची कुलदैवत असलेल्या श्री हिंगलाज माता प्रकट दिन ज्ञानोबा- तुकाराम, हिंगलाज माता की जय, महिला वर्ग फुगड्या खेळत व चौका चौकात फटाक्यांच्या अतिष बाजी करत वडवणी भावसार समाजाकडून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील हिंगलाज माता मंदिरात मुख्य कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमास शहरातील सर्व समाज बांधव विशेषता महिलांची मोठी गर्दी होती. यावेळी हिंगलाज माता प्रकट दिनाचे मुख्य आकर्षण होते वारकरी श्री संत ज्ञानेश्वर महाराज




शिक्षण संस्था येथील बाल वारकरी भक्ती मंडळ यांच्या टाळ, मृदंग व ज्ञानोबा तुकाराम च्या जय घोषणांनी वडवणी करांचे लक्ष वेधून घेतले.

भावसार समाजाचे दैवत असलेल्या श्री हिंगलाज माता प्रकट दिनानिमित्त शहरातील भावसार समाजाच्या वतीने विविध कार्यक्रमाच्या आयोजन करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यामध्ये सकाळी आठ वाजता श्री हिंगलाज मातेचा अभिषेक करण्यात आला

▶▶ उर्वरित पान २ वर

## पवनचक्की कंपन्यांची दांडगाई वाढली

### पोलिसां समोरच वार्तांकन करणा-या पत्रकाराचा मोबाईल हिसकावून शिविगाळ : डॉ . गणेश ढवळे





**बोरखेड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारात वरचेवर वाढ होत असून आज बीड तालुक्यातील बोरखेड येथील शेतकरी मावेजा मिळावा म्हणून टावर वर चढलेले असताना त्यांचे वार्तांकन करणा-या दैनिक हिंद जागृतीचे उपसंपादक मुस्तफा पठाण यांचा मोबाईल पवनचक्की

▶▶ उर्वरित पान २ वर

### जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला काकडहिरा ग्रामस्थांचा सकारात्मक प्रतिसाद

## तलावातील मोटारी काढल्याने संभाव्य पाणीटंचाई तूर्तास टळली

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील काकडहिरा तलावातून मोटारी काढून घेण्यासाठी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , उपविभागीय अधिकारी कविता जाधव , बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाच्या वतीने ग्राम महसूल अधिकारी बंडू आगलावे , राजुरी विभागाचे मंडळ अधिकारी प्रभू येवले , ग्रामविकास अधिकारी श्री गिरी तसेच उपअभियंता ल.पा. जिल्हा परिषद बीड पठाण , कनिष्ठ अभियंता जिल्हा परिषद बीड श्री कारगुडे व विद्युत विभागाचे वायरमन श्री बहिर यांनी शुक्रवार २८ मार्च रोजी तलावास भेट दिली . शेतकऱ्यास त्यांनी आवाहन केले . त्या आवाहनाला काकडहिरा गावातील शेतकऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन तलावात सोडलेल्या मोटारी काढून घेतल्या. बीड हा तसा दुष्काळग्रस्त



जिल्हा म्हणून ओळखला जातो. उपलब्ध पाणी पिण्यासाठी सांभाळून ठेवणे आवश्यक आहे . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी कळविल्यानुसार बीडमध्ये गेल्या पाच वर्षांत भूजल पातळीत संमिश्र वाढ झाली आहे , काही भागात घट झाली आहे तर काही भागात वाढ झाली आहे , विशेषतः २०१२१ च्या पावसाळ्यानंतर बीड जिल्हा समुद्रापासून दूर आहे . बीड जिल्ह्याचा काही भाग दुर्गम अणि डोंगराळ आहे . जिल्ह्यातील उत्तर भाग सपाट मैदानी आहे . जिल्ह्याच्या मध्य-दक्षिण भागात बालाघाटचे डोंगर आहेत . येथे चिंचोली , नेकनूर हे भाग येतात . या भागास मांजरथडी असेही म्हणतात . मांजरसुभ्याहून बीडकडे जाताना पालीघाट लागतो . गोदावरी ही जिल्ह्यातील प्रमुख नदी असून ती जिल्ह्याच्या उत्तर सीमेवरून वाहते . या भागास गंगथडी असेही म्हणतात . हा सुपीक भाग गाळापासून बनला

▶▶ उर्वरित पान २ वर




## बुद्धगया महाबोधी बुद्धविहारावर बौद्धांचा ताबा मिळेपर्यंत आंदोलनं चालूच राहणार!

### ● माजलगाव कृती समितीचे पत्रकार परिषदेतून आव्हान

**माजलगाव । प्रतिनिधी**

विश्ववंदनीय तथागत महाकारुणिक गौतम बुद्ध यांना ज्या ठिकाणी संबोधि प्राप्त झाले ज्या ठिकाणी ज्ञानप्राप्ती झाली ते ठिकाण म्हणजे बिहार राज्यातील बुद्धगया होय बुद्धगया येथे पिंपळाच्या वृक्षाखाली राजकुमार सिद्धार्थला ज्ञान प्राप्त होऊन ते सिद्धार्थ भगवान गौतम बुद्ध झाले त्या ठिकाणी जगातील महान सम्राट राजा अशोकाने बुद्ध धर्म स्वीकारल्या नंतर तेथे मोठे



विहार बांधले ते विहार आज जगातील बौद्ध धर्मियांसाठी पवित्र व आस्थेचा स्थान असून ते ब्राह्मण पुजाऱ्यांच्या ताब्यात आहे ते मुक्त होऊन

▶▶ उर्वरित पान २ वर

## महात्मा बसवेश्वर सामाजिक समता शिवा पुरस्कारासाठी व्यक्ती आणि संस्थांना आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

वीरशैव लिंगायत समाजाच्या सामाजिक शैक्षणिक आर्थिक विकास होण्यासाठी कलात्मक समाज प्रबोधन व साहित्य क्षेत्रात कार्य करणारे कलावंत, साहित्यिक, समाजप्रबोधनकार आणि समाजसेवकांना तसेच समाजासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना प्रतिवर्षी वैशाख शुद्ध अक्षय्य तृतीयेच्या दिवशी एक व्यक्ती, एक संस्था यांना महात्मा बसवेश्वर सामाजिक समता किंवा पुरस्कार देण्यात येणार आहे. प्रस्ताव सादर करतांनी वीर शैव लिंगायत समाजासाठी करण्यात आलेले कार्य यासंदर्भातील माहिती व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. त्याबाबतचे प्रस्ताव विहीत नमुन्यात दिनांक ११ एप्रिल २०२५पर्यंत सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब

▶▶ उर्वरित पान २ वर

# राज्यातील ५६० गोशाळांना देशी गोवंश परिपोषण योजनेचा लाभ वितरण म्हणजे नवसंजीवनी : बाजीराव ढाकणे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी विराजमान झालेले जेष्ठ समाजसेवक सन्माननीय शेखर भाऊ मुंदडा यांनी महाराष्ट्र राज्यातील गोमाता संकटात सापडलेल्या आहेत हे हेरले व गोमातांच्या संगोपनासाठी काही तरी आगळीवेगळी योजना सुरू करण्याचे ठरविले आणि मागिल २ वर्षांपासून अहोरात्र परिश्रम घेत देशी गोवंश परिपोषण योजना कार्यान्वित करण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी व मंत्री महोदय यांच्या सोबत चर्चा करून योजना सुरू केली. या योजनेचा लाभ म्हणून महाराष्ट्र राज्यातील ५६० गोशाळांना गुरुवार दिनांक २७ मार्च रोजी जानेवारी ,फेब्रुवारी व मार्च या ३ महिन्यांचे अनुदान म्हणून २५ कोटी रुपये संबंधित गोशाळांच्या बॅंक खात्यांवर ऑनलाईन पद्धतीने जमा करण्यात आले आहेत. याबद्दल महा एनजीओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य चे बीड जिल्हा समन्वयक श्री



बाजीराव ढाकणे यांनी सन्माननीय शेखर भाऊ मुंदडा यांचे आभार मानले आहेत.

गोशाळांमधील देशी गायींच्या पालन पोषणासाठी प्रति दिन प्रति गाय ५० रुपये अनुदान योजनेअंतर्गत दि २७ मार्च २०२५ रोजी राज्यातील ५६० गोशाळांमधील ५६५६९ गायींसाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटी ४५ लाख ६९ हजार ५०० रुपये इतके अनुदान महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत ऑनलाईन पद्धतीने लाभार्थी गोशाळांना वितरित करण्यात आले.

देशी गायींची कमी झालेली उत्पादन क्षमता,त्यांचे संगोपन तसेच भाकड किंवा अनुत्पादक गायींचे संगोपन करण्यासाठी पशुपालकांना येणार्या अडचणी लक्षात घेऊन गोशाळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या हेतुने सन २०२४- २०२५ मध्ये महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असणार्या गोशाळांना शासनाने गोवंश परिपोषण योजना सुरु केली.अनेक गोशाळांना

**● ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाचा कणा असणार्या देशी गोवंशाला या योजनेच्या लाभामुळे मिळणारी नवसंजीवनी येणार्या काळात देशी गोवंश वृद्धीसाठी आणि संगोपन – संवर्धनासाठी फायद्याची ठरेल– बाजीराव ढाकणे, सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा समन्वयक, महा एनजीओ फेडरेशन, महाराष्ट्र राज्य**

यातून फायदा तर झाला आहेच त्यासोबतच देशी गोवंश संगोपनामध्ये मदत झाली आहे.

या महत्वपूर्ण योजनेच्या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस साहेब,पशुसंवर्धन मंत्री मा.पंकजाताई मुंडे व महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष राज्यमंत्री दर्जा सन्माननीय शेखर भाऊ मुंदडा तसेच सर्व प्रमुख अधिकार्यांचे महा एनजीओ फेडरेशन चे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी मन:पूर्वक आभार मानले आहेत.




CMYK